IIP: WJHSS
**IIP**
**World Journal of Humanities and Social Sciences**

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता:

**प्रा. डॉ. वाघमारे के. एस.**

इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*सामाजिक विचार, सामाजिक-आर्थिक लोकशाही, दलित व दलितेतर विचारक*

**ABSTRACT**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार मानले जातात. त्यांनी मांडलेले समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता व मानवमूल्याधिष्ठित लोकशाही यांसारखे विचार आजच्या समकालीन समाजात अधिकच प्रस्तुत ठरतात. जातीय विषमता, आर्थिक असमानता, स्त्री-दलित शोषण, सांस्कृतिक वर्चस्व आणि लोकशाही मूल्यांची घसरण या समस्या आजही आपल्या समाजव्यवस्थेमध्ये प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार आजच्या भारतातील जातीय भेदभाव, आर्थिक विषमता आणि लोकशाहीच्या आव्हानांना प्रकर्षाने सामोरे जाण्यासाठी अत्यंत प्रासंगिक आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता ही आजच्या समकालीन भारतातील सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाहीच्या संघर्षात अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या समकालीन भारतामधील जातीय भेदभाव, दलितांवरील हिंसा आणि आर्थिक विषमता कायम आहेत त्यांचे परिमार्जन करण्यासाठी आंबेडकरांचे विचार अधिक आवश्यक ठरतात.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Waghmare, K. S. (2025). भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2152–2155.

**प्रस्तावना –**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय जातिव्यवस्थेला 'जातीचा राक्षस' म्हणून संबोधले, जी सामाजिक आणि आर्थिक शोषणाचे मूळ आहे. आंबेडकरांच्या राजकीय लोकशाहीला सामाजिक-आर्थिक लोकशाहीत रूपांतरित करण्याची मागणी आजही अपूर्ण आहे, कारण सामाजिक,आर्थिक, विषमता आणि सांस्कृतिक विषमता पूर्वाग्रह अजूनही समाजामध्ये कायम आहेत. समकालीन आव्हानांना पेलण्यासाठी त्यांचा सामुहिक आणि व्यक्तिगत मुकाबला करण्यासाठी आणि परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा वसा आणि वारसा जतन करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलन, आर्थिक न्याय, आणि धर्मनिरपेक्षतेच्या माध्यमातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता साधणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रस्तुत पेपर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता तपासन्याबरोबरच संविधानिक मूल्ये, आरक्षण आणि आर्थिक, लोकशाहीचा पाया हा सामाजिक जीवनाशी एकविसाव्या शतकात कसा स्थिर राहील याचा आढावा घेतो.

**विषय विवेचन :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६) यांची प्रतिमा ही वैश्विक आहे हे जितके वास्तव आहे तितकेच समकालीन उत्तरोत्तर निर्माण होणाऱ्या नवीन समस्या आणि प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी निश्चितच आपल्या राष्ट्राला त्यांच्या विचाराशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका राष्ट्राचे महामानव राहिले नाहीत तर त्यांची प्रतिमा ही वैश्विक झालेली आहे. त्यामुळे, "आंबेडकरांना एका अस्पृश्य जातीच्या वा अस्पृश्य जातीसमुहाच्या मुक्तीसंघर्षाचे नायक म्हणुन पाहणे चुकीचे आहे."[१] जगभरातील शोषित,वंचित जनसमुहाच्या मुक्ती संघर्षाचे नायक म्हणुन आंबेडकरांची प्रतिमा ही उत्तरोत्तर वृदिंगत होत आहे. "युरो-अमेरिकन-ऑस्ट्रेलियन जनसमाजात आंबेडकरांच्या विचारधारेबद्दल सामाजिक चळवळी व अकादमिक स्तरावर आकर्षण व आस्था सतत वाढत असताना दिसते आहे."[२]

**आंबेडकरांच्या सामाजिक विचारांची तात्विक बैठक :**

आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा पाया हा मानवकेंद्री दृष्टिकोनावर आधारित आहे. नैतिक मुल्यांची मुक्त उधळण असलेला समाज आंबेडकरांना अपेक्षित होता. समाजाला नैतिक मूल्यांनी बांधलेली रचना मानली जात असली तरी त्यामध्ये मानवांना त्याची मूल्य जपण्यासाठी मानवतावादी आणि मुक्त वातावरण निर्माण करणे हे आंबेडकरांना अपेक्षित होते. त्यांच्या मते, "समाजातील कोणतीही व्यवस्था जर समता, स्वातंत्र्य व बंधुतेवर आधारलेली नसेल, तर ती अन्यायकारक ठरते."[3] भारतातील जातव्यवस्था ही केवळ श्रमविभागणी नसून, श्रमिकांची विभागणी आहे, असे त्यांचे स्पष्ट प्रतिपादन होते. त्यामुळेच त्यांच्या सामाजिक कार्याच्या प्रारंभिक स्थानी जातिनिर्मूलन असून हाच त्यांच्या सामाजिक चिंतनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे.

काही प्रमुख साहित्यकृतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकंदरीत सामाजिक विचारांची तात्विक दिशा साधारणतः निश्चित होते. मात्र जगातील अनेक विद्वानांनी असंख्य साहित्यकृतीतून त्याच्या जीवनाचे अनेक पैलू उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे.1980 पर्यंत कीर धनंजय व खैरमोडे चांगदेव यांच्या लिखित चरित्राच्या आधारावर मराठी विश्वात जे आकलन साकारले त्याची व्यापक समीक्षा केली गेली नाही. "धनंजय किरांनी तर आंबेडकरांना सावरकरीय विचारांच्या प्रभावात मार्क्सविरोधी व गांधीशषु म्हणून रेखाटले आहे."[४] हे ही आपण नाकारू शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत दोन चरित्रे प्रकाशित झाली होती. "शंकरराव खरात, वसंत मून, गंगाधर पानतावणे, मा. फ. गांजरे, बी. सी. कांबळे, नानकचंद रत्तू, भालचंद्र फडके, सविता आंबेडकर, रावसाहेब कसबे, गोपाळ गुरू इत्यादींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनचरित्राचे विविध वैचारिक पैलू मांडले आहेत."[५] विशेषतः "साठोत्तरी काळात एलिनॉर झेलिएट आणि गेल ऑम्व्हेट यांनी डॉ. आंबेडकर यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाची जागतिक संदर्भात मांडणी केली. "गेल ऑम्व्हेट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू पाश्चात्त्य आधुनिक उदारमतवादाच्या संदर्भात मांडले. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे चरित्र जागतिक चर्चाविश्वात प्रतिष्ठापित केले. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षशील जीवनातील वैचारिक पैलूंची चर्चा गंभीरपणे केलेली आहे."[६]

उदाहरणार्थ,''ब्रिटिश वसाहतवादयांनी व भारतातील उजव्या विचारवंतानी हेतूत: गांधींची प्रतिमेचे वैश्विकीकरण केले मात्र वास्तविकतः आंबेडकरांपुढे गांधींच्या मर्यादा उघड झाल्या आहेत. या तुलनेत आंबेडकर आज जागतिक स्तरावर समजावून घेतले जात आहेत.''[७] त्यामुळे आंबेडकरांचा सामाजिक विचार आणि वारसा हा भारताच्याच नाही तर जगाच्या सामाजिक पुर्नरचनेसाठी महत्वपूर्ण आहेत.

या एकंदरीत चरित्रामधून आंबेडकरांची आधुनिकता, घटनात्मक देशभक्ती, घटनात्मक नैतिकता, राजकीय प्रतिनिधित्वाचा दावा, कृषि-औद्योगिक विचार, समाजप्रतिबद्ध विचार, सामाजिक लोकशाही, स्त्रीमुक्तीचा विचार, जातिअंताचा विचार, धम्मक्रांती अशा विचारांची आजच्या संदर्भात मांडणी केली आहे.

''दलित व दलितेतर विचारक, अभ्यासक, संशोधक, आकादामिक व कार्यकर्त्यांचे वास्तवलक्षी आकलनातून व जागतिकीकरणाच्या परिप्रेक्षातून पहिले असता वास्तविक दृष्ट्या आंबेडकरी तत्त्वज्ञान हे जागतिक स्तरावर जाऊन पोहचले आहे.''[८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा कृतीशील लढा असून तो वास्तववादी आणि कालातीत लढा आहे. जो जागतिक परिप्रेक्ष्यातून समकालीन कालखंडामध्ये आंबेडकरवाद हा मानवी मुक्तीसाठी महत्वपूर्ण असल्याचे अधोरेखित करतांना दिसून येत आहे. या समूहातून विशेषतः आजपर्यंत जातीपितृसत्तेच्या अनुषंगाने त्यांनी 'बहुस्तरीय शोषणात्मक असमानते'चे अनन्यसाधारण सिध्दांकन केले आहे. व त्यावर उपाययोजनाही सुचवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

भारतातील समकालीन प्रश्नाचा विचार करता ''जातीय आणि वर्गीय विषमतेच्या मुक्तीलढयाबरोबरच धर्म, वंश, लिंग, जात, आणि स्त्री-दास्य अशा बहुविध विषमतेच्या व शोषणाच्या नि:पात्तासाठी आंबेडकरांचे सिध्दांत आणि प्रत्यक्ष चळवळ ही प्रेरणास्थान आहे.''[९] आणि तिच्या निराकरणार्थ मार्क्सवादी तत्वप्रणालीशी विधायक मतभेद स्पष्ट करीत बौध्दतत्वज्ञानाचे आधुनिकीकरण केले आहे. हे त्यांचे जागतिकस्तरावर दखल घेण्याजोगे योगदान आहे. समकालीन परिस्थितीमध्ये अनेक संदर्भात, ''वेगवेगळया हितसंबंधाच्या गरजेतून तत्वज्ञान,विचारप्रणाली,विचार,प्रतीके यांच्यात समन्वय साधून आंबेडकरांच्या विचारांचा समरसतेसाठी प्रयत्न समकालीन कालखंडामध्ये मोठ्याप्रमाणात सुरु झालेला आहे.''[१०] उलट डॉ. बाबासाहेब आंबेडकर,सावरकर,हेडगेवार अशी समरसता मोहिम सुरु आहे ही व्युव्हरचना आणि मूळ आंबेडकरवाद यांच्यातील संघर्ष आणि नष्ट करण्याची व्यूहरचना आहे. याची जाणीव असणारा वर्गही आपपल्या पद्धतीने आंबेडकरांच्या सामाजिक विचाराच्या माध्यमातून विवेकी पद्धतीने सामाजिक पुनर्रचना करण्यासाटी प्रयत्नशील आहे.

**जातिनिर्मूलन आणि समकालीन समाज :**

आजही भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जातीय अस्मिता,वर्गीय अस्मिता सामाजिक भेदभाव व संरचनात्मक व संघटनात्मक अन्यायाचे विविध स्वरूपामध्ये अस्तित्व प्रस्थापित आहे. ''शिक्षण, रोजगार, धर्म, राजकारण. आणि सांस्कृतिक क्षेत्रात जातीय वर्चस्वाची गडद छाया उत्तरोत्तरवृद्धिंगत होतांना दिसून येते. आंबेडकरांनी मांडलेले जातिनिर्मूलनाचे तत्वज्ञान आजच्या काळात सामाजिक समावेशन (social inclusion) आणि सामाजिक न्याय (social justice) यांच्याशी सांगड घालून मानवी जीवन शोषणमुक्त करण्याचा प्रयत्न करतात.''[११] समकालीन सामाजिक आरक्षण, प्रतिनिधित्व, आणि संविधानिक संरक्षण ही साधने आंबेडकरांच्या विचारांचीच समकालीन रूपे मानता येतील. जी आपल्याला आपल्या अधिकारासाठी नेहमीच संरक्षक म्हणून पुढे येतात.

**स्त्री मुक्ती आणि लैंगिक समता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार केवळ जातकेंद्री नव्हते, तर ते स्त्री-मुक्तीचे प्रखर समर्थक होते. ''आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून भारतातीलच नाही तर जगातील कोणत्याही देशातील स्त्रियांना कायदेशीर हक्क, मालकी हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला.''[१२] आजच्या काळात स्त्रीयांवरील हिंसा, अत्याचार कामाच्या ठिकाणी असमानता आणि लैंगिक भेदभाव यांसारख्या समस्या पाहता, आंबेडकरांचे स्त्रीवादी विचार अत्यंत समकालीन ठरतात.

**लोकशाही, संविधान आणि सामाजिक नैतिकता :**

डॉ. आंबेडकरांच्या मते, ''लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती सामाजिक जीवनपद्धती आहे. सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही, हा त्यांचा मूलभूत विचार आजही तितकाच प्रखरपणे लागू होतो. वाढती

सामाजिक असहिष्णुता, अल्पसंख्याकांचे प्रश्न आणि लोकशाही संस्थांवरील ताण पाहता, संविधानिक मूल्यांची पुनर्स्थापना करण्यासाठी आंबेडकरांचे विचार दिशादर्शक ठरतात."[१३]

**समकालीन प्रस्तुतता: जागतिक व भारतीय संदर्भ :**

आजचा समकालीन समाज हा "जागतिकीकरण, तंत्रज्ञान व बाजारव्यवस्थेच्या प्रभावाखाली दबला गेलेला आहे. या प्रक्रियेत सामाजिक विषमता अधिक तीव्र होताना दिसते. अशा विदारक परीस्थितीमध्ये डॉ. आंबेडकरांचा राज्यकर्त्या आणि कल्याणकारी भूमिकेचा आग्रह, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि आर्थिक लोकशाहीची संकल्पना अत्यंत प्रस्तुत ठरते."[१४] दलित, आदिवासी, स्त्रिया व इतर वंचित घटकांसाठी आंबेडकरांचे विचार आजही प्रेरणास्थान आहेत.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार हे काळाच्या चौकटीत अडकलेले नसून, ते सतत नव्या अर्थाने उलगडत राहणारे आहेत. आजच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता अधिक ठळकपणे जाणवते. सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा व समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्यासाठी आंबेडकरांचे विचार केवळ स्मरणात न ठेवता, प्रत्यक्ष व्यवहारात आणणे ही आजच्या काळाची गरज आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता ही आजच्या भारतातील सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाहीच्या संघर्षात अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांचे विचार जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि आर्थिक विषमतेविरुद्धचा क्रांतिकारी दृष्टिकोन दर्शवतात, जे आजही जातीय हिंसा, लिंगभेद आणि आर्थिक असमानतेच्या समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त आहेत. याबरोबरच आपल्या राष्ट्रात निर्माण होणाऱ्या इतर राष्ट्रीय प्रश्नांवर जालीम उपाय शोधण्यासाठी फक्त भारतच नाही जगातील इतर राष्ट्रांना समकालीन सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी आंबेडकरांच्या विचारांशिवाय पर्याय नाही.

**संदर्भ सूची**

१. शरद पाटील, मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे. १९९३ पृष्ठ ८३
२. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन, पद्धती शास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१९ पृष्ठ १७३
३. भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००८ पृष्ठ ३७९
४. गेल ओम्वेट,आंबेडकर प्रबुद्ध भारताच्या अनु( सचिन वाघमारे) दिशेने,मधुश्री पब्लिकेशन पुणे. पृष्ठ २०५
५. परिवर्तनाचा वाटसरू,अभय कांता, पुणे. पृष्ठ २९
६. गुहा रणजीत, ए सबालट्रन स्टडीज १९८६-१९९५ युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा प्रेस १९९७ पृष्ठ ३७
७. मून वसंत, बुद्धकालीन स्त्री जीवन, सुगावा प्रकाशन, १९८९. पृष्ठ ९१
८. जोगळेकर, मृणालिनी, स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा : स्त्री प्रश्नाची चर्चा : एकोणिसावे शतक, पॉप्यूलर प्रकाशन, १९९१.पृष्ठ २३७
९. चव्हाण प्रवीण, दुय्यम जनसमूहाचा इतिहास, सबाल्टर्न स्टडीज, पृष्ठ ९७
१०. भास्कर लक्ष्मण भोळे आणी किशोर बेडकीहाळ (संपा.), शतकांतराच्या वळणावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००६, पृष्ठ २३१
११. वांबूरकर जास्वंदी, इतिहास लेखनातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, पृष्ठ १२३
१२. प्रतिमा परदेशी आणि विद्युत भागवत, अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने, सुगावा प्रकाशन, पुणे. १९९८ पृष्ठ ५६
१३. छत्रे लता दिलीप, बौद्ध धर्मातील स्त्री-जीवन, सुगावा प्रकाशन, २००५ ,पृष्ठ ८३
१४. भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण, अथर्व प्रकाशन,धुळे,२०१७ पृष्ठ १७१